प्रेसनोट दिनांक ०८/११/२०२१

नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालय कोपरखैरणे येथील - सेस/एलबीटी स्थानिक संस्था कर लिपीक (कंत्राटी कामगार) यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे दैनंदिनी क. | :- | एनआरआय सागरी पोलीस ठाणे दैनंदिनी क.दि.०८/११/२०२१ रोजी २९/१६:१७ वा |
| लोकसेवक नाव व कार्यालय | :- | श्री. विनायक हरीचंद्र पाटील, वय ३३ वर्षे, नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत वॉर्ड कार्यालय कोपरखैरणे येथील सेस/एलबीटी स्थानिक संस्था कर लिपीक (कंत्राटी कामगार) |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ३,००,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | :- | पहीला हप्ता रू.१,००,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार यांची खैरणे एमआयडीसीमध्ये खाजगी कंपनी आहे. तक्रारदार यांनी त्यांचे खाजगी कंपनीस सन २०१३ ते २०१६ या कालावधीतील आलेला सेस कर नवी मुंबई महानगरपालिका कार्यालयास सन २०१९ साली भरला आहे. सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीतील सेसकर वेळेत न भरल्यामुळे त्यावर दंडाची रक्कम व व्याजाची रक्कम कोपरखैरणे सेस/एलबीटी विभागातील कार्यालयीन संगणकामध्ये निरंक दाखविण्यासाठी लोकसेवक श्री.विनायक पाटील हे रू.३,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करीत असल्याची तक्रार, तक्रारदार यांनी दि.०८/११/२०२१ रोजी अेसीबी, नवी मुंबई कार्यालयात दिली होती.<br><br>दि. ०८/११/२०२१ रोजी शासकिय पंचा समक्ष लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान, तक्रारदार यांचे कंपनीचे नावे सेस कराची दंडाची व व्याजाची रक्कम निरंक दाखविण्यासाठी लोकसेवक श्री.विनायक पाटील यांनी तक्रारदार यांच्याकडे तीन लाख रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी करून रू. १,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारण्याचे कबूल केले.<br><br>त्यानंतर काहीवेळाने केलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक विनायक पाटील यांनी बिकानेर स्वीट मार्ट समोर दिवाळेगाव सीबीडी बेलापूर नवी मुंबई येथे तक्रारदार यांचे गाडीमध्ये तक्रारदार यांच्याकडून रू. १,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना १३:४९ वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई-मेल :- **spacbthane@mahapolice.gov.in**
ऑनलाईनतक्रार
ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

(ज्योती देशमुख)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई

Scanned with CamScanner